# महाराष्ट्र शासन
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
## DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH
Govt. Dental College & Hospital Building, 4th Floor, St. George's Hospital Compound, Near CST, Mumbai - 400 001.
Tel. No. +91-22-22620363-65 Telegram:" MEDUCATNSEARCH"
Fax: +91-22- 22652168 / 22620562 Website: http://www.dmer.org

क्र.एनयुआर/एमएचएन-सीडब्ल्युटी-२००७-८/ई/५/०८, दिनांक :- ८/०७/२००८

**<u>नोटीफिकेशन</u>**

**<u>अधिपरिचारीका स्पर्धा परीक्षा-२००७ (एमएचएन-सीडब्ल्युटी-२००७)</u>**

शासकीय वैद्यकीय/आयुर्वेद महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये बुध्दीमान, कार्यक्षम व अद्ययावत ज्ञानाने युक्त अशा तंत्रकुशल अधिपरिचारीका उपलब्ध व्हाव्यात तसेच अधिपरिचारीकांची रिक्तपदे भरताना कोणत्याही तक्रारीस वाव राहू नये, या हेतूने शासनाने अधिपरिचारीका पदाच्या नेमणूकीकरिता दिनांक २५ नोव्हेंबर २००७ रोजी स्पर्धा परीक्षा घेतली होती.

या प्रवेश परीक्षेच्या आधारे अधिपरिचारीका पदांच्या नियुक्त्या देण्याकरिता दिनांक १० डिसेंबर २००७ रोजी जाहिर झालेल्या निकालाच्या अनुषंगाने उमेदवारांकडून प्राधान्य अर्ज (प्रेफरन्स फॉर्म) भरुन घेण्यात येणार आहेत. सदर प्रेफरन्स फॉर्म भरुन घेण्याची प्रक्रिया महाराष्ट्रातील ०४ विभागीय केंद्रांवर घेण्यात येणार आहे. याबाबतचा जिल्हानिहाय केंद्राच्या प्रक्रियेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

खालील वेळापत्रकात नमुद केलेल्या विभागीय केंद्रावर त्या केंद्रासमोर नमुद केलेल्या जिल्हयातील उमेदवारांनी त्यांच्या राज्यस्तरीय गुणवत्ता यादी क्रमांकानुसार (SML No.) दि. २९/०७/०८ व दि.३०/०७/०८ रोजी सकाळी ०९ ते सायं.०५.०० वाजेपर्यंत उपस्थित रहावे.

खालील नमूद प्रमाणे सर्व आवश्यक असणाऱ्या प्रमाणपत्रां व्यतिरिक्त उमेदवारांनी विभागीय केंद्रावर येताना <u>काळया शाईचे बॉलपेन आणि सर्व प्रमाणपत्रांच्या झेरॉक्स प्रतींचे साक्षांकित केलेले प्रत्येकी दोन संच (दोन फाईल सहित) घेऊन उपस्थित राहणे आवश्यक आहे.</u>

याबाबतची आवश्यक त्या सर्व माहितीची पुस्तिका खाली नमुद केलेल्या वेळापत्रकातील सर्व उमेदवारांना (SML No. प्रमाणे) प्राधान्य अर्ज, संबंधित केंदावर देण्यात येणार आहेत. तसेच सदरची पूर्ण पुस्तिका संचालनालयाच्या संकेतस्थळावर (www.dmer.org) उमेदवारांच्या माहितीसाठी दि.२५/०७/०८ पासून उपलब्ध करुन देण्यात येईल.

**अधिपरिचारीका पदाच्या नियुक्तीसाठी उपलब्ध रिक्त ठिकाणांसाठी प्राधान्य अर्ज भरुन घेण्यासाठी बोलावण्यात आलेल्या उमेदवारांनी उपस्थित रहावयाचे केंद्र**

| प्रेफरन्स फॉर्म भरण्याचे केंद्र | प्रेफरन्स फॉर्म भरावयाच्या केंद्राचा पूर्ण पत्ता | उमेदवाराने परीक्षा दिलेल्या केंद्राचे ठिकाण |
|---|---|---|
| मुंबई | सर ज.जी.समूह रुग्णालये, भायखळा, मुंबई - ४०० ००८. (अधिसेविका कार्यालय) | मुंबई |
| पुणे | ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे - ४११ ००१. | पुणे, सोलापूर, सांगली, कोल्हापूर |
| औरंगाबाद | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, पानचक्कर रोड, औरंगाबाद. | औरंगाबाद, नांदेड, बीड, लातूर, धुळे |
| नागपूर | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, हनुमान नगर, नागपूर - ४४० ००३. | नागपूर, यवतमाळ, अकोला |

**अधिपरिचारीका पदाच्या नियुक्तीसाठी उपलब्ध रिक्त ठिकाणांसाठी प्राधान्य अर्ज भरुन घेण्यासाठी उपरोक्त तक्त्यात नमूद केंद्राप्रमाणे बोलावण्यात आलेल्या उमेदवारांचे "वेळापत्रक"**

| दिनांक व वेळ | राज्य गुणवत्ता यादी क्रमांक | प्रवर्ग |
|---|---|---|
| २९/०७/२००८ मंगळवार सकाळी ९.०० ते सायं ५.०० पर्यंत | ०१ ते ९२३ | खुला |
| | १७ ते ७४४ | एस.सी. |
| | २९ ते ४२९८ | एस.टी. |
| | ५१० ते ४०२४ | व्ही.जे. |
| ३०/०७/२००८ बुधवार सकाळी ९.०० ते सायं ५.०० पर्यंत | ५८ ते ८८५ | एन.टी.-१ |
| | २२ ते ४२१० | एन.टी.-२ |
| | ६ ते ४२८२ | एन.टी.-३ |
| | १८ ते १११० | ओ.बी.सी. |
| | १२४ ते ४१४४ | एस.बी.सी. |
| | १ ते ४३३८ | सर्व प्रकल्पग्रस्त आणि वैद्यकीय दृष्टया विकलांग उमेदवार |

**"वैद्यकीय चाचणीचे वेळापत्रक"**

| | | |
|---|---|---|
| दिनांक २२/०७/२००८ सकाळी ०८.०० ते दुपारी १२.०० वाजता | अधिक्षक, सेंट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई- ४०० ००१ | उपरोक्त नमुद उमेदवारांपैकी अपंग (पीएच) या संवर्गाची मूळ परीक्षा अर्जात मागणी केलेल्या सर्व उमेदवारांनी वैद्यकिय मंडळापुढे वैद्यकिय चाचणी करीता उपस्थित रहावे. |

टीपः- दि.२९/०७/०८ रोजी खुला, एस.सी, एस.टी व व्ही.जे प्रवर्गातील उमेदवारांनी व दि.३०/०७/०८ रोजी एन.टी-१,२,३, ओबीसी, एसबीसी व प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त व अपंग उमेदवारांनी संबंधित ठिकाणी सकाळी ०९ ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत हजर रहावे.

ज्या प्रकल्पग्रस्त व अपंग उमेदवारांनी ते प्रकल्पग्रस्त/अपंग असल्याचे त्यांच्या मूळ परीक्षा अर्जात नमुद केले आहे फक्त त्याच उमेदवारांना प्रकल्पग्रस्त व अपंग असल्याचा दावा करता येईल.

वरील तक्त्यात नमूद केलेल्या विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावयाच्या दिनांकाच्या दिवशी खालीलप्रमाणे त्यांची मूळ प्रमाणपत्रे व छायांकित प्रमाणपत्रे (साक्षांकित केलेली) सोबत आणावित.

१) एमएचएन-सीडब्ल्युटी २००७ ची गुणपत्रिका
२) राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र किंवा ग्राहय पारपत्र (Valid Passport)
३) एस.एस.सी व एच.एस.सी उतीर्ण प्रमाणपत्र
४) जीएनएम अभ्यासक्रमाच्या प्रथम,द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या गुणपत्रिका
५) पदवी आणि नोंदणी प्रमाणपत्र (एम.एन.सी) (with recent renewal date)
६) जीएनएम अभ्यासक्रम उतीर्ण झालेल्या महाविद्यालयाकडून उतीर्ण होण्यासाठी घेण्यात आलेले प्रयत्न प्रमाणपत्र (Attempt Certificate)
७) बी.एससी. नर्सिंग पदवी परीक्षा उतीर्ण असल्यास उतीर्ण केलेल्या प्रत्येक वर्षाच्या गुणपत्रिका
८) बी.एससी.नर्सिंग अभ्यासक्रम उतीर्ण झालेल्या महाविद्यालयाकडून उतीर्ण होण्यासाठी घेण्यात आलेले प्रयत्न प्रमाणपत्र (Attempt Certificate)
९) ॲडमिट कार्ड, रिसीप्ट-कम -आयडेंटी कार्ड
१०) वैद्यकीय दृष्टया सक्षम असल्याबाबतचे वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र याव्यतिरिक्त कोणत्याही संवर्गाची मागणी केलेली असल्यास त्या संबंधी खालील प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
११) मागास संवर्गाची मागणी केलेली असल्यास पुस्तकातील ॲनेक्शर-बी पहावे.
    अ) जात प्रमाणपत्र
    ब) जात वैधता प्रमाणपत्र किंवा जात प्रमाणपत्र वैधतेकरिता संबंधित प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित असल्याबाबतचे पत्र किंवा ०१ महिन्याच्या आत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबतचे शपथपत्र.
    **क) अनुसुचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना शासन नियमानुसार त्यांच्या नियुक्तीपुर्वी "जात वैधता" प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.**
    ड) नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र (व्हीजे, एनटी-१, एनटी-२, एनटी-३, ओबीसी,एसबीसी संवर्गाकरिता)
१२) अपंग(पीएच) किंवा प्रकल्पग्रस्त या विशेष संवर्गाची मागणी केलेली असल्यास (याकरिता एमएचएन-सीडब्ल्युटी-२००७ च्या माहिती पुस्तिकेतील ॲनेक्शर-सी पहावे)
    अ) अपंगत्व प्रमाणपत्र
    ब) प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र (सदरचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी किंवा जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्या कार्यालयाने निर्गमित केलेले असावे. **तसेच प्रकल्पग्रस्त उमेदवाराने नियुक्ती पुर्वी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची "वैधता" सादर करणे बंधनकारक राहील.)**
**१३) उपरोक्त नमुद राज्य गुणवत्ता क्रमांकाचे उमेदवार दिलेल्या वळेत उपस्थित न राहील्यास त्यांचा नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**

**सक्षम प्राधिकारी व संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**